# महाराष्ट्र विधानसभा

**दिवसाच्या कामकाजाचा क्रम**

**सोमवार, दिनांक ८ एप्रिल, २०१३**

**(सकाळी ११.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे -**

**दोन : कागदपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**संसदीय कार्यमंत्री** : विधानसभेच्या सन २०१२ च्या तिसऱ्या (हिवाळी) अधिवेशनात मा.मंत्री/मा.राज्यमंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहात दिलेल्या एकूण ४२२ आश्वासनांची यादी आणि विधानसभेचे सन १९९२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन ते सन २०१२ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन या कालावधीत विधानसभा सभागृहात देण्यात आलेल्या आश्वासनांपैकी एकूण ९३० आश्वासनांच्या पूर्ततेबाबतच्या माहितीच्या विवरणपत्रांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**तीन : विशेषाधिकार भंगाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स.नियम २७३ अन्वये).**

**चार : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**पाच : औचित्याचे मुद्दे - (असल्यास).**

**सहा : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

(१) **सर्वश्री नवाब मलिक,** नाना पटोले, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"वेस्टर्न कोल फिल्ड यांच्यामार्फत राज्यातील लघु व मध्यम उद्योग घटकांना महाराष्ट्र स्टेट को.ऑप. फेडरेशन लि. मुंबई यांची नोडल एजन्सी म्हणून नेमणूक करण्यात येणे, सदर बाबतची व वितरणाची जाहिरात कोणत्याही अग्रगण्य दैनिकात प्रसिद्ध न करणे, तसेच कोळसा वितरण पद्धतीत हाताळणी दलालांच्या नेमणुकीसाठी प्राप्त निविदांची संपूर्ण माहिती न देणे, कोळसा प्राप्त करण्याकरिता पात्र उद्योग घटकांनी अटी व शर्तींचे पालन न करणे, सदर हाताळणी एजन्टांकडून सुरक्षा ठेव यात अनियमितता असणे, तसेच सदर हाताळणी एजन्ट कोळसा, लघु व मध्यम उद्योगांना वाटप करते वेळी अधिकची रक्कम घेणे, शासनाचे त्यावर नियंत्रण नसणे, याबद्दल लघु व मध्यम उद्योजकांनी

वेळोवेळी मागणी करुनही त्याबाबतीत शासनाकडून अवलंबिले गेलेले वेळकाढू धोरण, यामुळे लघु उद्योजकांत पसरलेला तीव्र असंतोष, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **ॲड.माणिकराव कोकाटे**, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत गेल्या ३ ते ४ वर्षात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असून या बँकेकडून सहकार कायदा बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट व बँकेचे उपविधी यांचे जाणिवपूर्वक उल्लंघन केले जात असल्याचे निदर्शनास येणे, या गैरकृत्याबाबत बँकेचे माजी व विद्यमान अध्यक्ष यांच्यासह गैरकृत्यास मदत करणाऱ्या अन्य पाच संचालकांवर कारवाई करण्याबाबत मा.सहकार मंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ सप्टेंबर, २०१२ रोजी निवेदन देण्यात येणे, बँकेमध्ये संस्थेचे अभिलेखे बाहेर पळवून नेणे, इतिवृत्तामध्ये खाडाखोड करणे, कार्यकारी संचालकांसह कर्मचाऱ्यांस धमक्या देणे असे प्रकार होत असणे, या गैरकारभारात बँकेचे अध्यक्षांस मदत करीत नसल्याने बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कुठलेही कारण न देता त्यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करण्यात येणे, या बँकेस खर्च भागविणे शक्य होत नसल्याने राज्य सहकारी बँकेकडून अधिक कर्ज घेऊन निधीची गरज भागवावी लागणे, रोकड शिलकी अभावी वैधानिक रोखतेचे प्रमाण राखता येत नसणे, त्यामुळे बँकेच्या खर्चात काटकसर करुन एक वर्ष खर्च करु नये असा ठराव करण्यात येणे, विभागीय सह निबंधक, नाशिक यांचे दिनांक १६ ऑक्टोबर, २०१२, दिनांक २१ डिसेंबर, २०१२ व सहकार आयुक्त व निबंधक पुणे यांच्या दिनांक ३ जानेवारी, २०१२ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने खर्च करण्यास प्रतिबंध करण्याचे आदेश असतानाही कोट्यवधी रुपये खर्च करणे, दिनांक २३ फेब्रुवारी, २०१३ रोजी संचालक मंडळाची हरकत असताना कॉम्प्युटर सॉफ्टवेअरसाठी रु. १९ कोटींचा धनाकर्ष देणे, बँकेचे माजी-आजी अध्यक्ष व त्यांचे सहकारी निर्देशांचे पालन करीत नसल्याने सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९ अ नुसार जिल्हा उपनिबंधक, धुळे यांनी केलेल्या बँकेच्या तपासणी अहवालानुसार गंभीर दोष आढळणे, तरीही शासनाने दोषींवर कोणतीही कार्यवाही न करणे, त्यामुळे बँकेतील ठेवीदार व स्थानिक जनतेत पसरलेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्याबाबत करावयाची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री.विजयराज शिंदे, वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"मा.औरंगाबाद उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित असलेल्या पी.आय.एल. क्र.१०५/२०१२ मध्ये शासनाने सन २०११-१२ साठी अस्तित्वात आलेल्या सुमारे ३५० एएनएम/जीएनएम संस्थांची आयएनसीने तीन महिन्यात तपासणी करण्याची घेतलेली भूमिका, ज्या संस्था या तपासणीमध्ये सक्षम ठरतील त्यांना पुढे चालू ठेवाव्यात व उर्वरित संस्था बंद केल्यामुळे त्यामधील सुमारे १२००० विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान, यापैकी बहुतांश विद्यार्थी/विद्यार्थीनी दलित व आदिवासी समाजातील असून या संस्था सन २००५ पासून प्रचलित असलेल्या कार्यपद्धतीनुसारच सुरु असणे, वास्तविक पाहता आयएनसीची मान्यता नसताना सन २००५

पासून अनेक तुकड्या बाहेर पडणे, या तुकड्यातील हजारो विद्यार्थी/विद्यार्थीनी आता नर्सिंग व्यवसायात कार्यरत असणे, काही जण तर शासकीय सेवेतही असणे, संस्था सुरु केल्यानंतर सुमारे ३-४ वर्षांनी या संस्थांना आयएनसीची मान्यता मिळणे, सन २००५ पासून आयएनसीने निव्वळ ई.सी. आणि एमएनसीच्या परवानगीच्या आधारे सुरु असलेल्या संस्थांची तपासणी करताना त्यांना आयएनसीची मान्यता नसल्याबाबत कधीही आक्षेप न घेणे, तरी वरील ३५० संस्थांनी आयएनसीची मान्यता घेण्याचा आग्रह धरणे, सन २०११-१२ व २०१२-१३ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान, कारण माहे सप्टेंबर, २०११ व सप्टेंबर, २०१२ मध्ये प्रवेशित झालेले एएनएम विद्यार्थी अनुक्रमे माहे फेब्रुवारी, २०१३ व फेब्रुवारी, २०१४ मध्ये बाहेर पडतील, तर सन २०११-१२ व २०१२-१३ या शैक्षणिक वर्षात जीएनएम अभ्यासक्रमासाठी प्रवेशित झालेले विद्यार्थी अनुक्रमे माहे फेब्रुवारी, २०१४ व फेब्रुवारी, २०१५ मध्ये बाहेर पडणार, ज्या संस्थांना आयएनसी मान्यता मिळणार नाही ते अभ्यासक्रम शासन प्रस्तावानुसार बंद करावे लागणे, ज्यामुळे प्रवेशित विद्यार्थ्यांच्या भविष्यास बाधा निर्माण होणे, याकरिता शासनाने सन २०११-१२ व २०१२-१३ मध्ये सुरु झालेल्या एएनएम/जीएनएन अभ्यासक्रमास आयएनसी मान्यता असो वा नसो, त्या संस्था शासनाने सुरु ठेवणे व त्या विद्यार्थ्यांना राज्यात व्यवसाय करण्यास परवानगी देण्याची नितांत गरज, तसेच सन २०१३-१४ मध्ये आयएनसी मान्यता सक्तीची करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**( दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत - मध्यंतर )**

**सात : सन २०१३ - २०१४ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान (पाचवा दिवस).**

(१) जलसंपदा विभाग.

(२) ग्रामविकास व जलसंधारण विभाग.

(३) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.

(४) अल्पसंख्याक विकास विभाग.

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**

**आठ : शासकीय विधेयके :-**

**(१) पुर:स्थापनार्थ -**

सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ - महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे व सुधारणा) विधेयक, २०१३.

**(२) विचार, खंडश: विचार व संमत करणे -**

सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र करमणूक शूल्क (सुधारणा) विधेयक, २०१३.

(क) **भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री एकनाथराव खडसे (पाटील), महादेव बाबर, देवेंद्र फडणवीस, सुधीर मुनगंटीवार, चंद्रशेखर बावनकुळे, विवेक पाटील, श्रीमती मीनाक्षी पाटील, सर्वश्री धैर्यशील पाटील, गोपाळ शेट्टी, सुधाकर भालेराव, श्रीमती पंकजा मुंडे-पालवे, सर्वश्री संजय भेगडे, गिरीश बापट, श्रीमती माधुरी मिसाळ, श्री.भिमराव तापकीर, डॉ.खुशाल बोपचे, सर्वश्री सुरेश हाळवणकर, प्रमोद जठार, रविंद्र चव्हाण, नानाजी शामकुळे, अबू आजमी, प्रकाश शेंडगे, रविंद्र वायकर, विनोद घोसाळकर, प्रकाश (बाळा) सावंत, योगेश सागर, भरतशेठ गोगावले, सुर्यकांत दळवी, सदानंद चव्हाण, शरद पाटील, राजेश क्षीरसागर, चंद्रदिप नरके, डॉ.सुजित मिणचेकर, श्री. चिमणराव पाटील, श्रीमती मिराताई रेंगे-पाटील, सर्वश्री चंद्रकांत मोकाटे, विजय शिवतारे, अनिल कदम, धनराज महाले, प्रताप सरनाईक, एकनाथ शिंदे, रुपेश म्हात्रे, राजन विचारे, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री विजयराज शिंदे, संतोष सांबरे, संजय (बंडू) जाधव, आर.एम.वाणी, सुभाष देसाई,वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"ही विधानसभा सन २०१३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ - महाराष्ट्र करमणूक शूल्क (सुधारणा) अध्यादेश, २०१३ नापसंत करते."

(ख) **सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र करमणूक शूल्क (सुधारणा) विधेयक, २०१३.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, गिरीश महाजन, दादाराव केचे, अतुल देशकर, विजयकुमार देशमुख, संजय राठोड, गोपाळ शेट्टी, योगेश सागर, प्रकाश महेता, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.महादेव रामचंद्र बाबर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.गिरीश बापट, श्रीमती माधुरी मिसाळ, श्री.भिमराव तापकीर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३०१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ज) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.प्रकाश शेंडगे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २२५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(झ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुरेश हाळवणकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २२० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ट) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विवेक पंडित, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ९९ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ठ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विवेक पाटील, श्रीमती मिनाक्षी पाटील, श्री.धैर्यशील पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ६ एप्रिल, २०१३.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.